CNR No. MHRG1200003332016

नियमीत दिवाणी दावा क्र. २६/२०१६
महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ तर्फे
दिनेश कांबळे वि. मनोज मोरे

## निशाणी क्र.४८ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने वादीचा पुरावा बंद करण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तूत दाव्यामध्ये वादी मागील एक वर्षापासून गैरहजर असून दिनांक १९/०३/२०२२ वाद मुद्दे निश्चीत करण्यात आले आहे. त्यानंतर वादीस अनेकवेळा संधी देवून सुध्दा वादीने पुरावा दाखल केला नसल्याने दावा खारीज आदेशासाठी ठेवण्यात आला. वादीने प्रस्तूत दाव्यामध्ये पुरावा दाखल न करता दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ नुसार दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला आहे. या कारणास्तव प्रतिवादीने प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. वादीने आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तूत अर्जास आक्षेप नोंदवला आहे. वादीचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, वादी महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ यांनी प्रस्तूतचे अतिक्रमण हटवून मिळण्यासाठी दावा दाखल केला असून सदर महामंडळाचे वरीष्ठ व्यवस्थापक दिनेश आवबा कांबळे यांनी बदली झालेली असून तद्नंतर वरीष्ठ व्यवस्थापक संजय ढेकणे यांची सुध्दा बदली झाली आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे.

२. प्रतिवादी विद्वान वकील श्रीमती एम. एस. बाने आणि वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस. पी. सानप यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तूतचा दावा खारीज आदेशासाठी प्रलंबित असून वादीने निशाणी क्र. ४५ कडे दाव्याच्या सरनाम्यात दुरुस्ती करण्याचा अर्ज दिला आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे योग्य होणार नाही या मतास मी पोहोचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

## आदेश

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE Digitally signed by SANDEEP G SARODE Date: 2022.12.03 17:33:37 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०३/१२/२०२२

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड